<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची दुसरी यादी</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील पशुधनाच्या आणि पशुपालकांचा विभागात अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) ८५ (२७-०१-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपुरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुधनाच्या आणि पशुपालकांचा विभागात अनेक ११८६ पदे रिक्त असल्यामुळे पशुंचे आरोग्यरक्षण,रोगाचे नियंत्रण आणि अन्वेषणावर विपरित परिणाम होत असल्याचे माहे सप्टेंबर,२०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०१-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय सेवेतील एकूण १०८४ पदे रिक्त आहे. रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या अधिका-यांकडे देऊन पशुपालकांना नियमितपणे सेवा उलपब्ध करुन देण्यात येतात. सदर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय दूध योजना अडचणीत असल्याबाबत**

**(२) १०८ (२७-०१-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपुरी), अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय दूध योजना अडचणीत आली असल्याची माहीती वितरक संघटनेचे अध्यक्ष यांनी २७ जून, २०१४ रोजी निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वितरकांच्या अडचणींमध्ये लक्ष देण्याची मागणी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दूध हे वितरकांचे उपजिविकेचे साधन असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(६) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१५) :** (१) शासकीय दूध योजना अडचणीत आली, हे म्हणणे खरे नाही.

महाराष्ट्र दूध वितरक सेना या संघटनेने दि. २ जून, २०१४ रोजी बृहन्मुंबई दूध योजना व आरे केंद्र धारक सक्षम व्हावेत याकरीता निवेदन दिले आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

दुध वाहतुकदार हे आरे केंद्र चालकांच्या वतीने दूध व दुग्धजन्य पदार्थांची वाहतुक करीत आहेत, सदर वाहतुकीचे काम पूर्ण वेळ नसून अंशकालीन आहे.

(५) आरे केंद्र चालकांना दुधाच्या उपलब्धतेनुसार दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सध्या शासनाकडे येणा-या दुधाची आवक वाढल्याने केंद्र चालकांना जास्तीचे दूध व दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

आरे ब्रॅण्ड व को ब्रॅण्ड अंतर्गत दुग्धजन्य व पदार्थ व इतर पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

शासन निर्णय दि. ०१/१२/२०११ नुसार आरे केंद्रावरुन महानंदचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय दूध योजनेच्या आरे ब्रॅण्डसाठी दूधसंकलन कमालीचे घटल्याने या योजनेच्या अस्तित्वाला निर्माण झालेला धोका**

**(३) २५६ (२७-०१-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय दूध योजनेच्या आरे ब्रॅण्डसाठी दूधसंकलन कमालीचे घटल्याने या योजनेच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे २८ जुलै,२०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, यामुळे दूध वितरकावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, दूध पुरवठा सुरळीत चालू करण्याबाबत शासनाने कोणता तोडगा काढला आहे? व त्याचे स्वरुप काय आहे
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१५) :** (१) दूध संकलनात घट झालेली आहे, हे खरे आहे. तथापि, शासकीय दूध योजनेच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला, हे म्हणणे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

दूध वितरक हे आरे केंद्र चालकांच्या वतीने दूध व दुग्धजन्य पदार्थांची वाहतुक करीत आहेत. सदर वाहतुकीचे काम पूर्ण वेळ नसून, अंशकालीन आहे.
(३) आरे केंद्र चालकांना दुधाच्या उपलब्धतेनुसार दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सध्या शासनाकडे येणा-या दुधाची आवक वाढल्याने केंद्र चालकांना जास्तीचे दूध व दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

आरे ब्रॅण्ड व को ब्रॅण्ड अंतर्गत दुग्धजन्य पदार्थ व इतर पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

शासन निर्णय दि. ०१/१२/२०११ नुसार आरे केंद्रावरुन महानंदचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हिवरखेड (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथे जनावरांना अज्ञात आजाराची लागण होऊन शेकडो जनावरे मृत झाल्याबाबत**

**(४) ६५४ (२७-०१-२०१५). श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हिवरखेड (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथे जनावरांना अज्ञात आजाराची लागण होऊन शेकडो जनावरे मृत झाल्याच्या घटना माहे जुलै, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात घडल्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अज्ञात आजाराने मृत झालेल्या गुरांच्या मालकांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०१-२०१५) :** (१) मौजे हिवरखेड (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथे दि. २२/७/२०१४ व दि. २३/७/२०१४ रोजी दरम्यान आलेल्या पावसामुळे रानात चरण्यासाठी मोकाट सोडण्यात आलेली १३५ अशक्त जनावरे थंडीमुळे गारठून मृत पावली आहेत. हे खरे आहे.

(२) व (३) सदर बाब नैसर्गीक आपत्तीमध्ये येत नसल्याने, गुरांच्या मालकांना आर्थिक मदत देय होत नाही.

---

**खेड (जि.रत्नागिरी ) शहरात प्लॅस्टिक बंदी करण्याबाबत**

**(५) ९१७ (१५-१-२०१५). श्री. राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी ) शहरात शासनाने प्लॅस्टिक बंदी करण्याचा निर्णय घेतला असतांना प्लॅस्टिक पिशव्यांची राजरोसपणे विक्री सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लॅस्टिक बंदी करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (२६-२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

शासनाने महाराष्ट्र प्लास्टिक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम २००६ अन्वये संपूर्ण राज्यामध्ये ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या तसेच ८x१२ इंचापेक्षा कमी आकाराच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घातली आहे.

(२) महाराष्ट्र प्लास्टिक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम २००६ मधील तरतुदींची आपआपल्या कार्यक्षेत्रात कठोर अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व नगरपालिका/नगरपरिषदा तसेच महानगरपालिका यांना मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्तरावर कळविण्यात आले आहे.

खेड नगरपरिषदेने उपरोक्त नियमास अनुसरून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टीक पिशव्यांची विक्री व वापरावर बंदी केली असून, त्यांची काटेकोर अंमलबजावणी करणेसाठी 'प्लास्टीक न्युसन्स डिटेक्शन स्क्वॉड' गठीत केले आहे. त्यामार्फत शहरातील फेरीवाले व दुकानदार यांच्यावर अचानक धाडी टाकून दंडात्मक कारवाई करणेत येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील खामगांव व शेगांव क्षेत्रातील**
**पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(६) ९२७ (१५-०१-२०१५). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) बुलढाणा जिल्हयातील खामगांव व शेगांव क्षेत्रातील पोलीस पाटलांची ५५ ते ६० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

२) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे.

३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१५) :** (१) बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव उपविभागातील खामगाव व शेगाव तालुक्यातील ७८ पोलीस पाटलांची पदे रिक्त आहेत.

(२) व (३) खामगाव उपविभागातील भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी बिंदुनामावली अद्ययावत करणे आवश्यक आहे. बिंदुनामावली अद्यायावत करण्याची कार्यवाही सुरु असून बिंदुनामावली अद्ययावत होताच पोलीस पाटील भरती प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांच्या कृषिपंपाचे वीज कनेक्शन देणेबाबत.**

**(७) ९३७ (२७-०१-२०१५). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव जि.बुलडाणा येथील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नवीन कृषिपंपाचे वीज कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज व रक्कम भरुन सुध्दा अद्यापपर्यंत म.रा.वि.वि.कं.मर्या. खामगांव यांनी नवीन कनेक्शन दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना कृषीपंपाचे कनेक्शन तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे. नोव्हेंबर, २०१४ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाची संख्या ३८८१ असून नोव्हेंबर २०१४ अखेर पर्यंत ८८६ कृषीपंपाना विज जोडण्या दिल्या आहेत.

(२) कृषीपंपाचे कनेक्शन उपलब्ध करुन देण्याकरीता महावितरणातर्फे इन्फ्रा-२ या योजनेअंतर्गत कामे करण्यात येणार आहेत व त्याची निविदा प्रक्रिया सुध्दा पुर्ण झालेली असुन लवकरच कामाची सुरुवात होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) येथे शिरापूर सिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(८) ९४७ (२४-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) सन १९९६ साली शिरापूर सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यतेचा निर्णय होऊनही माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर योजना कार्यान्वित करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) सदर सिंचन योजना तातडीने कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :** (१) होय.

(२) योजनेची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु. ९०.५७ कोटी असून अद्यावयत खर्च ११/२०१४ अखेर रु. १४१.८५ कोटी आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा जास्त खर्च झाला आहे.

(३) या योजनेचा रु. २४७.७२ कोटींचा सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल शासन स्तरावर विचाराधीन आहे.

मागिल वर्षी २०१३-१४ मध्ये रु. १८.०० कोटी निधीची तरतूद होती. ती खर्च करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामधून मार्च २०१५ अखेर योजना अंशतः कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे घाटणे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील बॅरेज पध्दतीच्या बंधा-यात चार मीटरने पाणी सोडण्याची केलेली मागणी**

**(९) ९५० (२३-१२-२०१४). श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घाटणे (ता.मोहोळ, जि.सोलापूर)येथील बॅरेज पध्दतीच्या बंधा-यात चार मीटरने पाणी सोडण्याची मागणी शासनाकडे केली असून सदर मागणीबाबत माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०१-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील राजापुर तालुक्यात कमी वजन गटातील बालकांना आरोग्याला धोका निर्माण होत असल्याबाबत

**(१०) ९५८ (२२-१२-२०१४). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील राजापुर तालुक्यात कमी वजन गटातील बालकांची संख्या ९८२ असल्याचे आढळून आले आहे, तसेच शाळांमध्ये शालेय आरोग्य तपासणी मोहीमही सध्या ठप्प असल्यामुळे बालकांना याचा फटका बसत असून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याची गंभीर बाब माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी वजनाच्या बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी तसेच शाळांमध्ये तपासणी मोहीम पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०२-२०१५) :**(१) हे खरे आहे.

राजापूर तालुक्यात माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये आढळून आलेली ९८२ बालके ही मध्यम कमी वजनाच्या श्रेणीतील आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांचा माहे जुलै, २०१४ पासूप संप असल्याने RBSK अंतर्गत होत असलेली अंगणवाडीमधील बालकांची आरोग्य तपासणी बंद होती. तथापि अंगणवाडीतील मुलांची संदर्भसेवा ही जवळच असलेल्या राजापूर ग्रामीण रुग्णालय येथे करण्यात आली आहे. उर्वरित बालकांना त्या त्या ९ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये संदर्भसेवा देण्यात आली आहे. त्यामुळे आरोग्य तपासणी बंद असल्यामुळे बालकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील सर्व लाभार्थी, ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाचे लाभार्थी यांना घरपोच आहार (THR) दिला जातो. तसेच ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना अंगणवाडीमध्ये खाण्यासाठी सकाळचा नास्ता व गरम ताजा आहार दिला जातो. तीव्र कमी वजनाच्या लाभार्थ्यांना सर्वसाधारण श्रेणीमध्ये आणण्यासाठी Home Based VCDC चालू असून त्याचे नियंत्रण अंगणवाडी सेविका करीता आहेत.

RBSK अंतर्गत होत असलेली आरोग्य तपासणी मोहिम माहे डिसेंबर, २०१४ पासून पुर्ववत सुरु करण्यात आलेली आहे.

---

**मुंबईतील म्हाडाच्या इमारतीच्या पुनर्वसनाबाबत ३३ (५) धोरणात बदल करण्यात आल्याबाबत**

**(११) ९६२ (२३-१२-२०१४). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या इमारतीच्या पुनर्वसनाबाबतच्या ३३ (५) धोरणात बदल करण्यात आलेल्या आदेशाला एक वर्ष होवूनही म्हाडाकडून त्यांची अद्याप अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्यामुळे म्हाडा वसाहतीच्या पुनर्वसनाचे काम रखडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडा वसाहतीचे पुनर्वसनाचे काम तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०२-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील म्हाडा अभिन्यासाअंतर्गत अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास सुलभ व्हावा, तेथील रहिवाशांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी तसेच प्रामुख्याने अस्तित्वातील रहिवाशांचे पुनर्वसनानंतर उपलब्ध होणा-या अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळामधून म्हाडास सर्वसामान्यांना वितरणासाठी घरे उपलब्ध व्हावी, या उद्देशाने शासनाने विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) मध्ये दि.०८.११.२०१३ च्या अधिसुचनेन्वये सुधारणा केल्या आहेत. उपरोक्त सुधारणांमध्ये प्रामुख्याने रहिवाशांना किमान ३००.०० चौ.फुट पुनर्वसन क्षेत्र अनुज्ञेय केले आहे. तसेच समुह विकासासाठी उपरोक्त नियमावली पोषक असून यामध्ये योजनेचे क्षेत्र ज्याप्रमाणात वाढेल त्याप्रमाणात पुनर्वसन क्षेत्रामध्ये वा प्रोत्साहन क्षेत्रामध्ये भरघोस वाढीची तरतुद आहे. प्रस्तुत शासन निर्णयामुळे म्हाडाकडे मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्यांसाठी घरे उपलब्ध होतील.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) मधील सुधारणांनंतर म्हाडास सादर झालेल्या सुमारे ६० प्रस्तावांपैकी १२ प्रस्तावांना म्हाडामार्फत मंजूरी देण्यात आली आहे. त्यामधून म्हाडास सुमारे १०५० इतकी सर्वसामान्यांना वितरणासाठी घरे उपलब्ध होतील. म्हाडा अभिन्यासातील इच्छुक संस्थांनी त्यांच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी अर्ज केल्यास त्यावर म्हाडामार्फत तातडीने कार्यवाही करण्यात येते.

**संगमेश्वर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील प्रचितगडावर जाण्यासाठी असलेल्या लोखंडी शिडीची झालेली दुरावस्था**

**(१२) ९६६ (२३-१२-२०१४). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील प्रचितगडावर जाण्यासाठी असलेल्या लोखंडी शिडीची अतिशय दुरावस्था झाली असल्यामुळे शिडी धोकादायक होवून अनेकदा अपघात होत असल्याने पर्यटकांनी नविन शिडी बसविण्यासाठी संबधितांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही नविन शिडी बनविण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन शिडी बनविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१५) :**(१) कार्यकारी अभियंता, उत्तर सार्वजनीक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांनी जानेवारी, २०१५ मध्ये केलेल्या पहाणीत शिडीची दुरावस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) जिल्हा नियोजन अधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांच्या दि. २२ जानेवारी, २०१५ च्या पत्रान्वये सदरील कामासंदर्भात कार्यकारी अभियंता, उत्तर सार्वजनीक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांना सदर जागेची पाहणी करुन वस्तुस्थिती दर्शक अहवाल व सदर कामाचे ‘क’ वर्ग पर्यटनांतर्गत अंदाजपत्रक तयार करुन सादर करण्याबाबत कळविले आहे.

---

**नाशिक मधील रेडीरेकनरच्या अवास्तव दरवाढीमुळे राज्य शसनाचा महसूल ४० टक्यांनी घटल्याबाबत**

**(१३) १०३२ (२७-०१-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मधील रेडीरेकनरच्या अवास्तव दरवाढीमुळे दिनांक १ जानेवारी, २०१४ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ या कालावधीमध्ये राज्य शसनाचा महसूल ४० टक्यांनी घटल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक मध्ये सन २०१४ मध्ये राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेले रेडीरेकनरचे दर सन २०१५ मध्येही आहेत तसेच ठेवावे अशी मागणी माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुस-या आठवड्यात वा त्यासुमारास नाशिक जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१५) :** (१) हे खरे नाही.
तथापि, नोंदणी महानिरिक्षक यांचेकडून प्राप्त अहवालानुसार नाशिक जिल्ह्यात ४.४६% व नाशिक महानगर पालिका क्षेत्रात ०.९३% इतकी घट झाली आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने नोंदणीकृत खरेदी विक्री व्यवहारातील दर स्थानिक चौकशीतील दर इ. बाबीचा अभ्यास करुन सन २०१५ चे वार्षिक मूल्य दर तक्त्यामध्ये योग्य ते दर प्रस्तावित करण्यात आले आहेत.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पसचा प्रस्ताव**
**शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) १०४२ (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पसचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे जागा हस्तांतरीत करुनही या कॅम्पसचे काम अद्यापही सुरु न झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :**(१) होय,
(२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र नाशिक येथे स्थापन करण्याबाबत तत्कालीन मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. तथापि सदर प्रकरणी वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या पुनर्विचारार्थ सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिशुगृहे व दत्तक समन्वय संस्थांना सन २००९-१० पासून केंद्र शासनाकडून देय असलेले अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(१५) १०४५ (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिशुगृहे व दत्तक समन्वय संस्थांना सन २००९-१० पासून केंद्र शासनाकडून देय असलेले अनुदान प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून सदर प्रलंबित अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी राज्यशासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दत्तक समन्वय संस्थांना देय असलेले सर्व अनुदान वितरीत करण्यात आले असून शिशुगृह योजनेतंर्गत १२ संस्थांचे अनुदान प्रलंबित आहे.

(२) निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाच्या मंजूरीबाबत**

**(१६) १०४७ (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी माहे नोव्हेंबर, २०१३ मध्ये केंद्र शासनास पाठविलेला प्रस्ताव माहे नोव्हेंबर, २०१३ पासून केंद्र शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून सदर प्रस्तावाला मंजुरी मिळण्यासाठी राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१५) :**(१), (२) व (३) अभिजात मराठी भाषा समितीने सादर केलेला मराठी भाषेतील अहवाल दि.१२/७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये व इंग्रजीमधील अहवाल दि. १६/११/२०१३ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतच्या प्रस्तावासह केंद शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे पाठविली आहे. त्यानंतर शासनाच्या दिनांक ३/२/२०१४, दि. २८/३/२०१४, दि.१७/६/२०१४, दि. ११/७/२०१४ व दि.२६/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेण्याची केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

---

**दुधाचे दर कमी झाल्यामुळे दुध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याबाबत**

**(१७) १०५० (२७-०१-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये दुधाचे दर कमी झाल्यामुळे दुध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी मुल्य आयोग्याच्या अहवालाप्रमाणे प्रती लिटर २७ रुपये ५० पैसे भाव देण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दुग्ध उत्पादक शेतक-यांना दिलासा देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०१-२०१५)** :(१) दि. २९.१०.२०१४ रोजीच्या काही स्थानिक वृत्तपत्रांमधून ''दुधाच्या दरात कपात'' तसेच ''दुधाचा भाव घटल्याने शेतकरी अस्वस्थ'' अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) कृषी मुल्य आयोगाच्या अहवालाप्रमाणे प्रती लिटर २७ रुपये ५० पैसे भाव देण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे. तथापी, वस्तुस्थितीत कृषी मुल्य आयोगाकडून ज्या कृषी उत्पादनाच्या आधारभूत किंमती ठरविल्या जातात त्या उत्पादनामध्ये दुधाचा समावेश नाही.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध भुकटीच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाल्यामुळे देशातील दूध भुकटीच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्राने दूध खरेदी दर कमी केले आहेत.

राज्यात दुधाचा व्यवसाय शासन, सहकार व खाजगी यांच्यामार्फत केला जातो. त्यापैकी ६० % खाजगी क्षेत्र, ३९.५% सहकार क्षेत्र व ०.५% शासन असे दूध संकलनाचे प्रमाण आहे. केंद्र शासनाने दि. २६.३.२००२ रोजी एमएमपीओ १९९२ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार राज्यातील खाजगी/ सहकारी दूध संघ व दूध उत्पादक त्यांच्या व्यवसायाला पुरक असे खरेदी व विक्री दर तसेच कमिशन दर निश्चित करुन दुधाचे संकलन व वितरण त्यांच्या स्तरावरुन नियोजित करीत असतात. यामध्ये शासनास हस्तक्षेप करण्यास वाव नाही.

असे असले तरी दूध उत्पादक शेतक-यांच्या हिताकरिता शासकीय दूध योजनेमधून होणारे वितरण १ लाख लिटरने प्रतिदिन वाढविणे, उदगीर येथील प्रकल्प कार्यान्वीत करुन सुमारे १ लाख लिटर प्रतिदिन दुधापासून दूध भुकटी व लोणी तयार करणे, दूध भुकटी निर्यातीवर अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव पाठविणे इत्यादी उपाययोजना करण्याचे नियोजन केले आहे.

___

**गोरेगावच्या धर्तीवर नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत**

**(१८) १०५३ (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगावच्या धर्तीवर नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, मुंबई यांनी मिटकॉनकडून जागेची पाहणी करुन या चित्रनगरीसाठी अनुकूल असलेल्या जागेची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा प्रशासनाला निर्देश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चित्रनगरीसाठी जागा उपलब्ध करुन या चित्रनगरीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१५) :**(१) होय.

(२) जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांच्याकडून मौजे मुंढेगांव, ता.इगतपुरी येथील सर्वे नं.४५९ क्षेत्र ५४.५८ या जागेबाबत कागदपत्रे प्राप्त झाली असून प्रस्तुत जमिन या विभागाला हस्तांतरीत करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याची महसूल विभागास विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील कटक मंडळांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत**

**(१९) १०५८ (२३-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील कटक मंडळांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० एप्रिल, २०१३ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्णयांची माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत संबंधित विभागामार्फत कोणतीही अंमलबजावणी केलेली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करुन राज्यातील कटक मंडळ क्षेत्रामध्ये शासनाच्या कल्याणकारी योजना राबविण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१५) :**(१), (२) व (३) यासंदर्भात मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २ सप्टेंबर, २०१३ रोजी आढावा बैठक घेण्यात आली असून सर्व संबंधित विभागांना याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

---

**नाशिक येथे टर्मिनल मार्केट उभारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२०) १०६६ (२२-१२-२०१४). श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे टर्मिनल मार्केट उभारण्याच्या प्रस्तावास दिनांक २२ जुलै,२००९ च्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता मिळूनही माहे नोव्हेंबर,२०१४ पर्यंत चार वर्षानंतरही सदर टर्मिनल मार्केटचे काम सुरु झाले नसल्याने निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी दिनांक ७ जानेवारी,२०१२ रोजी वा दरम्यान विभागीय आयुक्त नाशिक यांनी सहकार व पणन विभागाला प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१५) :**(१) होय,

(२) होय,

(३) नाशिक टर्मिनल मार्केटच्या उभारणाकरीता आवश्यक असलेल्या मौजे पिंपरी-सय्यद, जि.नाशिक येथील शासन मालकीची १०० एकर जमीन टर्मिनल मार्केटची नोडल एजन्सी असलेल्या महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास विनामुल्य उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत अन्य मंत्रालयीन विभागाशी विचारविनिमय सुरु असून त्यावर अंतिम निर्णय होऊन सदरची जमीन उपलब्ध झाल्यानंतर टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथे शाहू महाराजांचे स्मारक उभारण्याबाबत**

**(२१) १०८३ (१५-०१-२०१५). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे शाहू महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याच्या शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्मारकाचे दिनांक ७ जानेवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास पुण्याच्या डिझाईन कन्सल्टेशन या कंपनीने सादरीकरण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहू कन्स्ट्रक्शन कंपनीला आपला पूर्ण प्रोजेक्ट अहवाल सादर करण्यास दोन महिन्याचा कालावधी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त कंपनीकडून शासनास स्मारकांचा पूर्ण प्रोजेक्ट अहवाल प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय असल्यास प्रोजेक्ट अहवालाचे स्वरुप काय आहे व याबाबत शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे काय,

(५) सदर कंपनीकडून पूर्ण प्रोजेक्ट अहवाल प्राप्त झाला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) कोल्हापूर येथील शाहू मिल येथे राजर्षि शाहू महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचेसमोर दि. ७ जानेवारी, २०१४ रोजी सादरीकरण करण्यात आले होते. त्यावेळी स्मारक उभारणीबाबतचा अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत संबंधित कंपनीला सूचित करण्यात आले होते, हे खरे आहे.
(४) व (५) डिझाईन कन्सल्टेशन, पुणे या कंपनीने प्रस्तुत स्मारकाचा तीन टप्प्यातील बांधकामाचा एकूण रु. १६९.०० कोटी इतक्या रकमेचा तयार केलेला प्रकल्प अहवालाचा प्रस्ताव आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी दि. २ सप्टेंबर, २०१४ च्या पत्रान्व्ये सादर केला असून त्यांची छाननी चालू आहे.

---

**कोल्हापूर शहर येथील पर्यटक मार्गदर्शक केंद्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(२२) १०९० (२३-१२-२०१४). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहर हे ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे शहर असल्याने दररोज हजारो पर्यटक येत असल्याने एका छताखाली पर्यटक मार्गदर्शक केंद्राची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हा पासून करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१५) :** (१) व (२) कोल्हापूर व सांगली येथील नागरिकांच्या / पर्यटकांच्या सोयीसाठी महामंडळाचे कोल्हापूर येथे माहिती व आरक्षण केंद्र कार्यान्वीत आहे.
(३) सदरचे केंद्र सन १९९७ पासून चालू करण्यात आले आहे. तथापि, महामंडळाने दि. १९.०५.२०१४ रोजीच्या आदेशान्वये कोल्हापूर येथील माहिती व आरक्षण केंद्र बंद करण्यात आले होते. परंतु, कोल्हापूर व सांगली येथील नागरिकांच्या / पर्यटकांच्या सोयीसाठी महामंडळाने दि. २३.०५.२०१४ च्या सुधारीत आदेशान्वये कोल्हापूर येथे माहिती व आरक्षण केंद्र पुन्हा कार्यान्वीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कोल्हापूर चित्रनगरी प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(२३) १०९६ (२२-१२-२०१४). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरचा चित्रनगरी प्रकल्प गेल्या ३२ वर्षापासून प्रलंबित असून सदरचा प्रकल्प खाजगीकरणातून राबविण्याकरिता निविदा मागविल्या असता त्यालाही प्रतिसाद आला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प त्वरीत पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: उक्त प्रकल्प केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१५) :** (१) ३२ वर्षापासून प्रकल्प प्रलंबित नाही. बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्तावर निविदा मागविण्यात आल्या होत्या, मात्र त्यास प्रतिसादर मिळाला नाही हे खरे आहे.

(२) प्रकल्प कार्यान्वित व पूर्ण करण्याच्या उद्देशाने २०११ मध्ये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे संचालक मंडळ पुर्नगठीत करण्यात आले. चित्रनगरी परिसरात अतिक्रमण होऊ नये म्हणून प्राथम्याने संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला व ते काम प्रगतीपथावर आहे. याशिवाय महामंडळाला लवकरात लवकर उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण व्हावेत, यासाठी महामंडळाने तयार केलेल्या नुतनीकरण व मुलभूत चित्रिकरण सुविधा प्रस्थापित करण्याच्या प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाने मान्य केले आहे. अर्थसंकल्पीय तरतुदीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या प्रगतीनुसार शासन निधी उपलब्ध करुन देत आहे व देणार आहे.

मुलभूत कामांना सुरुवात झाली असल्याने त्यांची प्रगती व आढावा या आधारे संचालक मंडळ व आवश्यक तेथे शासनाच्या सहाय्याने प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. मात्र सद्यस्थितीत प्रकल्प पूर्ण करण्याचा अवधी निश्चित करता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील ऐतिहासिक स्थळाचा विकास करण्यासंदर्भात**

**(२४) ११०० (२२-१२-२०१४). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा ) येथील ऐतिहासिक स्थळाचा विकास करण्यासंदर्भात दिनांक १२ जून, २०१३ रोजी वा त्या सुमारास रु.२५० कोटी रुपयांच्या अंदाजित आराखड्यास बुलढाणा जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यांतर्गत कोणकोणत्या कामांचा अंतर्भाव करण्यात आला आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०२-२०१५) :** (१) नाही,

जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी कळविल्यानुसार सिंदखेडराजा बृहत विकास आराखडा तयार करण्याकरीता प्रकल्प विकास सल्लागार नियुक्त करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) येथील विद्युत उपकेंद्रांचे काम अपूर्ण असल्याबाबत.**

**(२५) ११०१ (२७-०१-२०१५). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांव राजा जि.बुलढाणा येथील १३२ केव्ही विद्युत उपकेंद्रांचे दोन वर्षापूर्वी ९० काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनीचे गत २ वर्षापासून २५ पोल उभारणे, तारा ओढणे इत्यादी काम अद्याप पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे पूर्ण होऊन विद्युत पुरवठा सुरू होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे .

सदर विद्युत उपकेंद्राची स्थापत्य कामे ८० % व विद्युत अभियांत्रिकी कामे ९४.८% पूर्ण झाली आहेत.

(२) होय.

(३) सदर उपकेंद्राचे काम जवळपास पूर्णत्वास आले आहे. वाहिनींच्या कामांपैकी ४० मनोरा पायाभरणी व ९ मनोरा उभारणीची कामे पूर्ण झाली आहेत. उपकेंद्र व वाहिनी उभारणीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत संबंधीत कंत्राटदारास सक्त ताकीद देण्यात आली आहे.

---

**खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यामध्ये टेंभू योजनेंतर्गत ६५ कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) १११३ (२३-१२-२०१४). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यामध्ये टेंभू योजनेंतर्गत ६५ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे मंजूर असताना गेली १० वर्षापासून त्याची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील कामे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत व ती कामे पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केल्या आहेत,
(३) याप्रकरणी अद्यापही कोणत्याही उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) टेंभू प्रकल्पांतर्गत एकूण ७२ को. प. बंधारे नियोजित असून त्यापैकी १३ को.प. बंधा-याची कामे पूर्ण झालेली असून ०८ को. प. बंधा-याची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत ५१ को. प. बंधा-याची कामे निधी उपलब्धते नुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**मौजे बडनेरा (ता.जि.अमरावती) येथील आरक्षित जागेवर कामगार भवन इमारत बांधण्याबाबत**

**(२७) ११२४ (२३-१२-२०१४). श्री. रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बडनेरा (ता.जि.अमरावती) येथे कामगार भवन इमारत बांधकाम करणेसाठी जागा आरक्षित केली आहे काय,
(२) असल्यास, आरक्षित जागेवर इमारत बांधकाम करण्यासाठी शासनाने निधी मंजूर केला आहे काय, सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, वरील कामाबाबत संबंधित लोकप्रतिनिधींनी शासनाकडे यासंदर्भात निधीची मागणी केली होती काय ?

**श्री. प्रकाश मेहता (१८-२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
तथापि, सदरहू जागेवर बांधकामासाठी मंडळाच्या निधीतून खर्च करण्यात येणार असून या बांधकामासाठी वास्तुशास्त्रज्ञ नियुक्त करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) होय, हे खरे आहे.

---

**अमरावती राजापेठ बडनेरा (जि.अमरावती) या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(२८) ११२६ (२२-१२-२०१४). श्री. रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती राजापेठ बडनेरा (जि.अमरावती) येथील रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम निधीअभावी पाहिजे त्या प्रमाणात प्रगतीपथावर सुरु नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू रस्त्याच्या कामासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरहू रस्त्याचे काम लवकरात लवकर केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्नांकित रस्ताच्या कि.मी.१५६/८०० ते कि.मी.१५७/६०० लांबीतील रुंदीकरणासह बी.बी.एम. चे काम पुर्ण झाले आहे. डांबरीकरण व इतर संकींण कामे बाकी असून, काम पुर्ण करण्याचा कालावधी दि.२१.५.२०१५ पर्यंत आहे.

तसेच कि.मी.१६३/३०० ते कि.मी.१६३/८०० लांबीतील रुंदीकरणासह बी.बी.एम. चे काम पूर्ण झाले आहे. डांबरीकरण व इतर संकीर्ण कामे बाकी असून, काम पूर्ण करण्याचा कालावधी दि.३१.७.२०१५ पर्यंत आहे.

विहित मुदतीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

**वडाळी तलाव व कोंडेश्वर तलावाची (जि.अमरावती) स्वच्छता**
**तसेच नौकावहन सुरु करण्याबाबत**

**(२९) ११३४ (२३-१२-२०१४). श्री. रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील वडाळी व कोंडेश्वर हे दोन्ही तलाव निर्सगाचे सानिध्यात असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने या ठिकाणी येत असतात या तलावाची स्वच्छता करून या तलावात नौकावहन सुरु करण्याबाबत शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१५) :**

(१), (२) व (३) निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. तथापि जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत कोंडेश्वर तलावावर दि. १८.१.२०१४ पासून नौकावहन चालू आहे. वडाळी बगीचा हा खाजगीरित्या विकसीत करण्याकरीता व BOT तत्वावर राबविण्याकरीता अमरावती महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने पारीत केलेल्या ठरावानुसार BOT तत्वावर कामे सुरु आहेत.

---

**मुंबई शहरातील नाल्यांवर व रेल्वे ट्रकवर घरे बांधण्याच्या योजनेचे**
**सादरीकरण म्हाडाच्या वास्तू तज्ञांनी केल्याबाबत**

**(३०) ११४८ (२३-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील नाल्यांवर व रेल्वे ट्रकवर घरे बांधण्याच्या योजनेचे सादरीकरण म्हाडाच्या वास्तू तज्ज्ञांनी गृहनिर्माण विभागाच्या प्रधान सचिवांसमोर दिनांक २२ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील चेंबुर माहूल परिसरातील खासगी कंपन्यामधून बाहेर पडणारे प्रदूषित पाणी आणि वायू यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(३१) ११५० (२२-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील चेंबुर माहूल परिसरातील खासगी कंपन्यामधून बाहेर पडणारे प्रदूषित पाणी आणि वायू यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर प्रदूषणास आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(३) असल्यास अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

चेंबूर , माहूल परिसरतील आजूबाजूच्या वस्तीमध्ये कोणताही विशिष्ट आजार एप्रिल २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात आढळून आले नसल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी एम /प.विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी त्यांचे अहवालात नमूद केले आहे.

(२) आणि (३)

चेंबूर परिसरातील उद्योगांनी अद्यावत हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणांची उभारणी केली असून परीपुर्ण स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारली आहे. प्रक्रियाकृत सांडपाण्याचा बहुतांश पुनर्वापर करुन उर्वरित प्रक्रियाकृत सांडपाणी खाडीमागे समुद्रामध्ये विसर्जित करण्यात येते.

चेंबूर परिसरातील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमितपणे जवाहरनगर, वाशी नाका, टाटा हौसिंग कॉलनी व बी.पी.सी.एल स्पोर्ट्स क्लब या ठिकाणी वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासण्याचे काम केले जाते. तथापि, सदर परिसरातील हवेतील धुलकणांचे प्रमाण काही वेळेस विहित मर्यादेपेक्षा जास्त आढळून येते. त्यास मुंबई व सभोवतालच्या परिसरातील पायाभूत सुविधा बांधकाम प्रकल्प, रहीवाशी बांधकाम प्रकल्प व वाहनांची होणारी वाहतूक कोंडी इत्यादी घटक कारणीभूत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगांची नियमितपणे पाहणी करण्यात येत असते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत माहूल खाडीच्या घेतलेल्या पाण्याच्या पृथःक्करण अहवालावरुन खाडीच्या पाण्याची गुणवत्ता खराब झाल्याचे आढळून येत नाही. उपरोक्त उद्योगात निर्माण होणारा घातक घनकचरा हा सर्वसाधारणपणे सामाईक प्रक्रिया यंत्रणेकडे विहित पध्दतीने योग्य ते विल्हेवाटीसाठी पाठविण्यात येत असतो.

---

## पुणे शहरातील ससून रुग्णालयाच्या आवारातील कर्मचाऱ्याच्या खोलीत होत असलेले अवैध व्यवहार

**(३२) ११५४ (२२-१२-२०१४). श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ससून रुग्णालयाच्या आवारातील एका कर्मचाऱ्याच्या खोलीत जुगार, मटका खेळण्यासह गांजा व मद्य पिण्याचे प्रकार सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ससून रुग्णालयाच्या आवारातील पार्किंगमध्ये मद्यधुंद कर्मचाऱ्यांकडून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निष्कारण बेदम मारहाण केल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग एक व दोन बाबत याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या आवारात पे अॅण्ड पार्क पार्किंग कंत्राटदाराच्या कर्मचा-यामार्फत नर्सिंग विद्यार्थ्यांस मारहाण झाल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात रुग्णालय प्रशासनाने संबंधित ठेकेदाराचा पे अॅण्ड पार्कचा ठेका तात्काळ रद्द केला आहे. तसेच विद्यार्थी मारहाण प्रकरणी बंडगार्डन पोलीस ठोणे येथे तक्रार अर्ज दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मांजरी बुद्रुक (ता. हडपसर, जि. पुणे) येथील पाणी टंचाई

**(३३) ११६१ (२२-१२-०१४०). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरी बुद्रुक (ता. हडपसर, जि. पुणे) येथे पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळे नागरिकांचे हाल होत आहेत म्हणून तातडीने पाणी योजना मंजूर व्हावी अशी नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिण्याच्या पाण्याच्या अडचणीमुळे नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करुनही प्रस्ताव प्रलंबित आहे तसेच पाणी उचलण्यासाठी लागणा-या जागेसाठी पाटबंधारे विभागाने अद्यापही परवानगी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास  उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली  वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. बबनराव यादव (लोणीकर) (१०-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दि.०२/०६/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मांजरी बुद्रुक (ता.हवेली,पुणे) येथील नळ पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर योजनेतील हेडवर्क्सच्या जागेसाठीचा भूसंपादनाचा प्रस्ताव पाटबंधारे विभागास सादर केला असून त्यास मंजूरी अप्राप्त आहे.
(४) सदर योजनेच्या हेडवर्क्स व जलशुध्दीकरण केंद्राच्या भूसंपादनासाठी पाटबंधारे विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे. याबाबत दि. ०८/१२/२०१४ रोजी पाटबंधारे विभागासोबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संयुक्त पाहणी केली आहे. पाटबंधारे विभागाच्या सूचनेनुसार दि.१६/१२/२०१४ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुधारित प्रस्ताव अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्याकडे सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर मांजरी बुद्रुक येथे उड्डाण पुल बांधण्याबाबत

**(३४) ११६५ (२२-१२-२०१४). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर मांजरी बुद्रुक येथे उड्डाण पुल बांधण्याबाबतची मागणी नागरिकांकडून अनेक वर्षापासून करण्यात येऊन सदर प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा सार्वजनिक बांधकाम विभागाने या उड्डाण पुलासाठी प्रस्ताव तयार करुन ही अजून पर्यत हे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उड्डाणपुल लवकरात लवकर बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-२-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन पुलाचे काम पुर्ण महानगरपालिकेमार्फत एमएसआरडीसीकडे प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु निधी अभावी काम न झाल्याने सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. त्यानुसार सा.बां.विभागामार्फत उड्डाण पुलाचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यकमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहिल.

---

**राज्यातील अनुदानास पात्र ठरलेल्या शेकडो शाळांना अद्यापही अनुदान मिळण्याबाबत**

**(३५) ११७७ (२२-१२-२०१४). श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ. मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) राज्यातील अनुदानास पात्र ठरलेल्या माहे जून, २०१३ पूर्वीच्या शाळांना माहे जानेवारी २०१४ पासून अनुदान वितरित करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१३ मध्ये वा त्या सुमारास घेतला होता, हे खरे आहे काय,

२) असल्यास, अद्यापही पुणे विभागातील /जिल्ह्यातील तसेच अमरावती विभागातील अकोला, यवतमाळ, अमरावती, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील माहे जून २०१३ नंतरच्या अनुदानास पात्र ठरलेल्या शेकडो शाळांना अनुदान वितरित करण्यात येईल असे आश्वासन तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री यांनी दिलेले होते, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, विभागातील शिक्षण क्षेत्रातील संघटनांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आपल्या मागण्यांकरिता उपोषणाचा मार्ग अवलंबिला आहे, हे ही खरे आहे काय,

४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१५) :** (१), (२) व (३) होय.

(४) अनुदानास पात्र झालेल्या शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पशुसंवर्धन खात्यात पशु देखभाल करणा-या डॉक्टर व कर्मचा-यांची १८५८ पदे रिक्त असल्याबाबत**

**(३६) ११८० (२७-०१-२०१५). श्री. बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ. मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुसंवर्धन खात्यात पशु देखभाल करणा-या डॉक्टर व कर्मचा-यांचे १८५८ पदे रिक्त असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाब शेतक-याच्या निगडीत असल्याने शासन सदर पदे त्वरीत भरणार

आहे काय,

(३) असल्यास, केव्हापर्यंत रिक्त भरण्यात येणार आहेत वा भरण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०२-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील पशुंवर देखभाल करणाऱ्या डॉक्टर व कर्मचारी यांची एकूण १०८४ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) गट-अ व गट-ब संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन यांचे स्तरावर सुरु आहे. पशुसंवर्धन खात्यात रिक्त असलेली पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून त्यानुसार आयोगाद्वार परिक्षा घेण्यात आली आहे. आयोगाकडून शिफारस पात्र उमेदवारांची यादी प्राप्त होताच पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत आहार पुरवण्याबाबत**

**(३७) १२२१ (२२-१२-२०१४). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. योगेश सागर (चारकोप), श्री. नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे सर्वसाधारण बालके, ६ महिने ते ६ वर्षे तीव्र कुपोषित बालके आणि गर्भवती व स्तनदा मातांना (THR) नुसार आहार पुरविण्यासाठी सामाजिक संस्था/महिला बचत गटांना कंत्राटे देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) तसेच यातील कंत्राटे मिळालेल्या महिला बचत गटा व्यतिरिक्त अन्य संस्थाच हा आहार पुरवीत असल्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील किती बचतगट प्रत्यक्ष आहार पुरवीत आहेत व किती बचत गट कंत्राट दुसऱ्याला देऊन आहार पुरविण्यात येत आहेत

(४) असल्यास, उक्त बाबत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०२-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रत्येक जिल्हयातील जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत स्थानिक महिला बचत गट/महिला मंडळ/ग्राम समुदाय यांचेकडून THR आहार पुरवठ्याची प्रकल्पनिहाय अर्ज मागवून निवड प्रक्रिया करण्यात येत आहे. सध्यस्थितीत अर्ज प्रकल्पांपैकी ३१२ प्रकल्पांमध्ये स्थानिक महिला

बचत गट/महिला मंडळ/ग्राम समुदाय यांचेमार्फत THR आहार पुरवठा सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. मेहमुदूर रहेमान समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत**

**(३८) १२२६ (२२-१२-२०१४). ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री. योगेश सागर (चारकोप), श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री. इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लीम समाजाची वस्तुस्थिती मांडणारा डॉ.मेहमुदूर रेहमान समितीने आपला अहवाल शासनास दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ रोजी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा अहवाल विधीमंडळाच्या सभागृहात मांडण्यासाठी व त्यातील शिफारशी त्वरीत अंमलात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) तसेच खालावत चाललेल्या मुस्लीम समाजाच्या विकासासाठी शासन कोणत्या नवीन उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-१-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) मुस्लिम समाजातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सद्यस्थितीचा अभ्यास व पाहणी करुन त्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनास उपाययोजना सूचविण्याकरिता डॉ.महम्मदूर रहेमान, सेवानिवृत्त, भाप्रसे यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाची शासनाकडून मे, २००८ मध्ये स्थापना करण्यात आली होती. सदर अभ्यासगटाने आपल्या अहवालात केलेल्या शिफारशी व यावरील कार्यवाही ही विविध प्रशासकीय विभागाशी आणि महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग इ. यांच्याशी संबंधित आहे. अभ्यासगटाच्या अहवालावरील शिफारशीवर संबंधितांकडून अभिप्राय मागविण्यात आले असून, उद्योग व कामगार, सामाजिक आरोग्य, नगर विकास, विधी व न्याय, नियोजन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य अ ल्पसंख्याक आयोग यांचे अभिप्राय वगळता अन्य विभागांचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत. सदर अभिप्राय प्राप्त करुन घेण्याबाबत संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूरातील आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय गोरेवाडा येथील रेस्क्यू सेंटरच्या बांधकाम निधी अभावी बंद पडल्याबाबत**

**(३९) १२४३ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ. मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरातील आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय गोरेवाडा येथील रेस्क्यू सेंटरच्या बांधकाम निधी अभावी बंद पडल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गोरेवाडा प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय,

(३) असल्यास, रेस्क्यू सेंटरसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०२-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

नागपूरातील आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय गोरेवाडा येथील वन्यप्राणी बचाव केंद्राच्या बांधकामाकरिता सन २०१३-१४ मध्ये रु.९२०.०० लक्ष निधी देण्यात आला होता. सन २०१४-१५ मध्ये रु.३५०.०० लक्ष नियतव्यय अर्थसंकल्पीत केला होता, त्यापैकी रु.२०९.९६ लक्ष निधी वितरीत करण्यात आली आहे. तसेच रु.२१०.०० लक्ष निधीची पुनर्विनियोजन करण्यात आले असून त्यातील रुन. १२६.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच हिवाळी अधिवेशनात रु.१७००.०० लक्ष निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर झाला असून त्यापैकी रु.१०२०.०४ लाख निधी उपलब्ध करन दिला आहे, अशाप्रकारे सन २०१४-१५ मध्ये रु.१३५६.०० लाख निधी देण्यात आला असून उर्वरित निधी देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांवर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकांची मर्यादा वाढवून देण्याबाबत.**

**(४०) १२४४ (२२-१२-२०१४). श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ. मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांवर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांची मर्यादा जिल्हा परिषद स्तरावर १ लक्ष रुपयांवरुन २ लक्ष रुपयांपर्यंत वाढवून देण्यात यावी अशी मागणी राज्यातील शिक्षकांकडून होत असल्याने निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय प्रतिपूर्ती यादीमध्ये २७ गंभीर व महागड्या स्वरुपाच्या आजारांचा समावेश नसल्याचे खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच विदर्भातील कॅन्सर रुग्णालयाच्या सुध्दा समावेश या यादीमध्ये करण्यात यावी अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद स्तरावर कार्यरत शिक्षकांना वैद्यकीय देयकाचा संपूर्णत: लाभ मिळत नसल्याचे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१५) :** (१) ते (५) राज्यातील शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीसंदर्भात धोरण निश्चितीची बाब सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील असून जिल्हा परिषद कर्मचा-यांसहित सर्व शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या रु. १ लक्ष पर्यंतचे अधिकार संबंधीत विभागप्रमुखांना असून त्यावरील रक्कमेची देयके मंजूरीचे अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेले आहेत. ग्रामविकास विभागामार्फत विभागप्रमुखांच्या प्रतिपुर्ती अधिकार मर्यादेत वाढ करण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सार्वजनिक आरोग्य विभागास सादर करण्यात आला आहे.

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १९ मार्च, २००५ अन्वये २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांचा समावेश करण्यात आला असून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सर्व कर्मचा-यांना देय आहे. त्याच बरोबर सार्वजनिक आरोग्य विभागाने विहित केलेल्या रुग्णालयांव्यतिरिक्त अतिरिक्त रुग्णालयांचा समावेशाबाबत मागणी प्राप्त झाल्यास त्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागास सादर करण्यात येईल.

---

**राज्यात निराधारांसाठी योजना राबविण्यात येत असल्याबाबत**

**(४१) १२६० (२२-१२-२०१४). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात निराधारांसाठी कोणकोणत्या योजना राबविण्यात येत आहेत व सदर योजनेतील लाभार्थ्यांना सध्या किती रकमेचा लाभ देण्यात येत आहे,
(२) सदर रक्कमेत वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०३-२०१५) :** (१) राज्यात निराधार व्यक्तींना मासिक अर्थसहाय्य देण्यासाठी विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्याला रु.६००/- प्रतिमहा निवृत्ती वेतन देण्यात येते. एकाच कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास सदर कुटुंबास रु.९००/- प्रतिमहा या मर्यादेत निवृत्ती वेतन देण्यात येते.

(२) व (३) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**भिमा नदीवरील कोरेगांवभिवर (ता.दौंड, जि.पुणे) या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत**

**(४२) १२९२ (२४-१२-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा नदीवरील कोरेगांवभिवर (ता.दोंड, जि.पुणे) या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे. तसेच अद्यापही या प्रस्तावाबाबत शासनाने निर्णय घेतला नसल्यास किती कालावधीत या प्रश्नावर निर्णय होणे अपेक्षित आहे,

(३) या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. गिरीष महाजन (२५-०२-२०१५) :** (१) नाही

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**प्राजक्ता मतिमंद निवासी शाळेस सुपे (ता.बारामती, जि.पुणे) या संस्थेस अनुदान मिळणेबाबत.**

**(४३) १२९३ (२२-१२-२०१४). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राजक्ता मतिमंद निवासी शाळा सुपे (ता.बारामती, जि.पुणे) दानशुर व्यक्ती व ग्रामस्थांच्या सहकार्याने सुप्यासारख्या ग्रामीण व दुष्काळी भागात सन २००२ पासुन निवासी पध्दतीने मतिमंद मुलामुलीची शाळा चालविली जात असून या मतिमंद निवासी शाळेस शासनाच्या अपंग कल्याण विभागाने सन २००७ मध्ये विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मतिमंद निवासी शाळेत अनुदान मिळणेबाबत प्रस्ताव अपंग कल्याण विभागाने शासनास सादर करुनही शासनाने या मतिमंद निवासी शाळेस अनुदान मंजूर केले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मतिमंद निवासी शाळेस अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत, व किती कालावधीत या मतिमंद निवासी शाळेस अनुदान मंजूर होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०१-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) विना अनुदान तत्त्वावरील शाळांना अनुदान देण्याची बाब ही धोरणात्मक असून त्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

---

**राज्यातील दुध उत्पादक शेतक-यांकडून खरेदी करावयाच्या दुध खरेदी दरामध्ये झालेल्या कपातीबाबत**

**(४४) १२९७ (२७-०१-२०१५). श्री. राहूल कुल (दौंड), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री. भारत भालके (पंढरपूर-मंगळवेढा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुध उत्पादकांकडून खरेदी करावयाच्या दुध खरेदी दरामध्ये रज्यातील खाजगी दुध खरेदी केंद्रांनी अचानकपणे दुध खरेदी दर प्रति लिटर २ ते ३ रुपयांनी कमी केल्याने दुध उत्पादक आर्थिक अडचणीत आले आहेत, ही बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आली आहे काय,
(२) असल्यास, दुध उत्पादकांकडून खरेदी करावयाचे दुध दरामध्ये कपात होण्याची कारणे काय आहेत,
(३) राज्यातील दुध उत्पादक शेतक-यांना न्याय देण्यासाठी अचानकपणे कमी केलेले दुध खरेदी दर पुर्ववत करणेबाबत शसनाने कोणती कार्यवाही केली आहे व याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०१-२०१५) :**(१) दि. २९.१०.२०१४ रोजीच्या काही स्थानिक वृत्तपत्रांमधून "दुधाच्या दरात कपात" तसेच "दुधाचा भाव घटल्याने शेतकरी अस्वस्थ" अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) ऑक्टोबर, २०१४ पासून राज्यात दुधाकरीता पुष्ठकाळ असल्याने दुधाची उपलब्धता वाढली आहे. दरम्यान याच काळात आंतरराष्ट्रीय बाजारात दूध भुकटीचे दरात मोठ्या प्रमाणात घसरण झाल्याने दूध भुकटी प्रकल्पधारकांकडून दुधाची मागणी कमी झाल्याने दूध खरेदी दरातही घट झाली आहे.
(३) दूध उत्पादक शेतक-यांचे हितासाठी या पुष्ठकाळात शासनाने दूध खरेदी करुन शासकीय दूध योजनेमार्फत द्रवरुप दुधाच्या विक्रित वाढ केली आहे. याशिवाय उदगीर येथील शासकीय दूध भुकटी प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला आहे. दूध भुकटी निर्मितीवर प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने दूध भुकटी निर्यातीवर १० % पर्यत प्रोत्साहन अनुदान देण्याबाबतचा केंद्र शासनास पत्र पाठवून विनंती करण्यात आली आहे.

---

**लातूर जिल्ह्यातील उदगीर, निलंगा, औसा आणि अहमदपूर नगरपालिकांतील पाणी टंचाई निवारणाबाबत**

**(४५) १३०८ (२२-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील उदगीर, निलंगा, औसा आणि अहमदपूर नगरपालिकांना पाणी टंचाई निवारणासाठी माजी मुख्यमंत्र्यांच्या निधीमधून ३ कोटी ६४ लाखांचा निधी मंजूर झाला होता सदरहू निधी नगरपालिकांना मिळाला असून पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) परतु, सध्या सुरु असलेल्या बनशेळकी धरणातील पाणीसाठा संपल्यामुळे देवर्जन मध्यम प्रकल्पातून पाणी आणण्याचे काम हाती घेण्यात आले होते, मात्र तेथेही पाणी नसल्यामुळे या निधीचा कोणताही फायदा नागरिकांना झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्य पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत शासन विचार करणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव यादव (लोणीकर) (०३-०३-२०१५) :**(१) लातूर जिल्ह्यातील उद्‌गीर नगरपरिषदेस पाणी टंचाई निवारणार्थ करावयाच्या आकस्मिक योजनांतर्गत रु.३.६४ कोटीच्या प्रस्ताव्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर तातडीची पाणी पुरवठा योजना टंचाई कालावधीत पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता, हे खरे आहे.

शासनाकडून निलंगा, औसा व अहमदपूर नगर परिषदेस पाणी टंचाई निवारणार्थ आकस्मिक तातडीची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील मूळ महसूली गावठाणाच्या हद्दीबाहेरील तांड्यांवर स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याबाबत.**

**(४६) १३१३ (२२-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील सात तालुक्यातील मूळ महसूली गावठाणाच्या हद्दीबाहेरील किमान ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावांचा दर्जा देऊन संबंधित तांड्यांवर स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याचा निर्णय शासनाने दीड वर्षापूर्वी घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अमंलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिका-यांनी संबंधित

तहसीलदारांमार्फत अहवाल मागविला होता. परंतु अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निर्णयाबाबत अद्यापही अहवाल सादर न करण्याची कारणे काय,
(४) असल्यास, तातडीने याबाबत निर्णय घेऊन स्वतंत्र ग्रामपंचायती निर्माण कराव्यात अशी मागणी बंजारा समाजातील नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१५) :** (१) नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयात गतवर्षी खरेदी केलेले सुमारे ३० हजार क्विंटल भात गोदामात पडून असल्याबाबत.**

**(४७) १३२५ (१५-०१-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयात गतवर्षी खरेदी केलेले सुमारे ३० हजार क्विंटल भात गोदामात पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे नविन भात ठेवण्याकरीता गोदाम उपलब्ध नसल्याने नविन भात खरेदी करावा वा नाही असा व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच नविन भात खरेदी केव्हापासून करण्यात येणार आहे?

**श्री.गिरीश बापट (०२-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे. खरीप पणन हंगाम २०१३-१४ मध्ये किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयात खरेदी करण्यात आलेला सुमारे २३,९९८.५४ क्विंटल धान गोदामामध्ये शिल्लक आहे.
(२), (३) व (४) किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून शेतक-यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डिस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये म्हणून राज्य शासनाच्या वतीने मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ या दोन अभिकर्ता संस्थामार्फत धान / भरडधान्य खरेदी करण्यात येते.

खरीप पणन हंगाम २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेला कोकण विभागातील धान मिलर्सकडून भरडाईकरिता उचल न झाल्यामुळे तो धान गोदामात तसाच पडून राहिला आहे. सदरहू भरडाईविना शिल्लक असलेल्या धनाची जाहिर ई-लिलावाद्वारे विक्री करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

खरीप पणन हंगाम २०१४-१५ मध्ये धान / भरडधान्य खरेदी सुरु करण्याबाबत

दि.३०.१०.२०१४ रोजी शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, कोकण विभागात गोदामांची समस्या असल्याने अभिकर्ता संस्थेस धान खरेदी सुरु करता आलेली नाही.

---

**चोपडा व यावल तालुक्यात ट्रान्सफार्मर मोठ्या प्रमाणात नादुरुस्त असल्याबाबत**

**(४८) १३२७ (२७-०१-२०१५). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा व यावल तालुक्यात विजेचे ट्रान्सफार्मर मोठ्या प्रमाणात नादुरुस्त झाले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रान्सफार्मर दीड-दोन महिन्यानंतर दुरुस्त करुन मिळतात त्यामुळे दोन्ही तालुक्यातील शेती व बागायती पिकांचे अतोनात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ट्रान्सफार्मर नादुरुस्त झाल्याबरोबर तो २४ तासांच्या आत बदलून देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल काय ?

(४) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०१५) :** (१) होय.

(२) नाही. माहे एप्रिल, १४ ते डिसेंबर, १४ या कालावधीमध्ये जळगाव जिल्ह्यामध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणात वाढलेल्या अनधिकृत वीज वापरामुळे रोहित्र नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले.

जळगांव जिल्ह्यातील चोपडा व यावल या तालुक्यांमध्ये माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये शेतीपंप, गावठाण व इतर ठिकाणचे एकूण नादुरुस्त झालेल्या रोहित्रांची संख्या अनुक्रमे १०६ व ७१ इतकी असून त्यापैकी अनुक्रमे १०६ व ५८ रोहित्रे तातडीने बदलविण्यात आली.

उर्वरीत १३ रोहित्रांवरील अनधिकृत जोडण्या / भार काढून टाकल्यानंतर रोहित्रे बदलण्यात आली. नादुरुस्त रोहित्राच्या ठिकाणी नविन रोहित्रे देण्याआधी त्यावरील अधिकृत करणे क्रमप्राप्त असते. सदरच्या ठिकाणी अनाधिकृत वीज जोडण्या काढून टाकणे किंवा अनधिकृत वीज जोडण्या व भार अधिकृत करण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी आल्यामुळे साधारणतः १५ दिवसांपेक्षा जास्त विलंब झाला.

(३) होय, रोहित्र नादुरुस्त झाल्यानंतर तो २४ तासांच्या आत बदलण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात आलेली आहे.

विद्युत रोहित्र तातडीने दुरुस्त करण्याबाबत जळगाव परिमंडळामार्फत सातत्याने पाठपुरावा करुन माहे एप्रिल, २०१४ ते ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत ३४४७ रोहित्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तसेच मुख्य कार्यालय मुंबई कडून ४४१ नवीन रोहित्रे जळगाव जिल्ह्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच मुख्य कार्यालय मुंबईद्वारे पुणे परिमंडळातील ११० रोहित्रे जळगाव जिल्ह्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आली. अशी एकूण ३९९८ रोहित्रे जळगाव जिल्ह्याकरीता माहे एप्रिल, २०१४ ते ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील मुळ मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत येणा-या शेतजमिनीचा मोबदला देण्यास दिरंगाई केल्याबाबत**

**(४९) १३२८ (२२-१२-२०१४). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील मुळ मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत येणा-या शेतजमिनीचा मोबदला देण्यास शासनस्तरावरुन गेल्या ६ वर्षापासून दिरंगाई करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच याकरिता पाटबंधारे विभागाकडून २ ३ रक्कम भरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना नुकसानभरपाई देण्याकरिता विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतक-यांना तातडीने मोबदला देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :**(१) नाही.

(२) गुळ मध्यम प्रकल्पाच्या धरण व मुख्य कालव्यासाठी लागणा-या जमिनीची भुसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली असून बाधीत शेतक-यांना जमीनीचा मोबदला देण्यात आला आहे.

प्रकल्पाच्या वितरण व्यवस्थेसाठी लागणारी जमीन खाजगी संमतीने ताब्यात घेण्यात आली असून भूसंपादनपोटी लागणारी २/३ रक्कम महसूल विभागाच्या अंतर्गत असलेल्या विशेष भुसंपादन अधिकारी जळगाव यांना अदा करण्यात आली आहे.

(३) व (४) महामंडळाने आवश्यक भूसंपादन प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठविले असून आवश्यक २/३ रकमा वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. महसूल विभागाने अंतीम निवाडा दिल्यावर योग्य तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

**चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील मुळ मध्यम सिंचन प्रकल्पांतर्गत शेतचाऱ्या पूर्ण न झाल्याने सिंचनाचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(५०) १३२९ (२२-१२-२०१४). श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील मुळ मध्यम सिंचन प्रकल्प अंतर्गत पाणी अडवून पाच वर्षे झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या प्रकल्पाच्या शेतचाऱ्या पूर्ण झाल्या आहेत काय,

(३) असल्यास, या प्रकल्पांतर्गत शेतचाऱ्या पूर्ण न झाल्याने या प्रकल्पांचा पूर्ण क्षमतेने सिंचनाचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या शेतचाऱ्या पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१५) :**(१) होय
(२) नाही
(३) सन २०१२-१३ पासून कालवा व वितरिकांवर अग्रस्थ क्षेत्रावर सिंचन करण्यात येत आहे.
(४) शेतचा-यांचे काम करण्यासाठी गुळ उजव्या व डाव्या कालव्यावरील भाग-१ कामाचे अंदाजपत्रक मंजूर असून निविदा कार्यवाही सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.